माहिती अधिकार

महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय,
कोंढवा-येवलेवाडी,पुणे महानगरपालिका.
कार्यालयाचा पत्ता :- जे.एस.पी.एम.बिल्डींग,
सावंत कॉर्नर,कात्रज, पुणे-४६.
कार्यालयाचा संपर्क क्र.:- ०२०-२५५०८८००
ईमेल :kondhwa@punecorporation.org
विस्तारित क्रमांक :- ०२०-२५५०८८०२/०३
जावक क्र. :-२५३४ दिनांक :- ८/९/२०२१
२५३४

अपिल प्राधिकारी तथा उप अभियंता, कोंढवा-येवलेवाडी
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपिल क्र.:अ.प्रा.तथा महा.सहा.आयुक्त कार्यालय कोंढवा-येवलेवाडी /पुणे मनपा/अपिल/दि.०७/०९/२०२१

१. अपिलकर्ता श्रीमती भारती रोहिदास कामठे,
राहणार :- मु.पो.येवलेवाडी, पुणे

२. जन माहिती अधिकारी तथा,
कनिष्ठ अभियंता ,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

श्रीमती भारती रोहिदास कामठे
विरूध्द
जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका.

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

अपिलकर्ता श्रीमती भारती कामठे यांनी दिनांक १४/६/२०२१ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांचेकडे येवलेवाडी प्र.क्र.४१ खंडोबा मंदिर येथील रस्त्याबाबतची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता.

'दि.०१/०५/२०१७ रोजी नव्याने स्थापित कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडून सदर ठिकाणी रस्त्याचे काम करणेत आलेले नाही. तसेच ग्रामपंचायत काळातील व त्या आधीचे सदर रस्त्याबाबत आमचे कार्यालयाकडे कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाहीत.' असे पत्र जा.क्र.१४७२ दि.०७/०७/२०२१ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकाऱ्याने उपलब्ध करून दिलेली माहिती व इतर पत्र व्यवहारासंबंधी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| माहिती अधिकारातर्गत अर्ज सादर केल्याचा दिनांक | माहिती उपलब्ध करून द्यावयाचा अंतिम दिनांक | अपिलार्थी उत्तर पाठविल्याचा दिनांक | अर्जदाराने शुल्क भरल्याचा दिनांक | अर्जदारास माहिती दिल्याचा दिनांक |
| १४/०६/२०२१ | १३/०७/२०२१ | ०७/०७/२०२१ | निरंक | निरंक |

**प्रथम अपिल अर्ज दाखल करण्याचे कारण** – श्रीमती कामठे यांनी अपिल अर्जात पुढीलप्रमाणे नमूद केले आहे– ''येवलेवाडी प्र.क्र.४१ खंडोबा मंदिर येथील रस्त्याबाबतचा तपशील मिळणेकामी.''

| प्रथम अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम अपिल अर्ज दाखल करावयाचा अंतिम दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज मुदतीत दाखल केला आहे का ? | प्रथम अपिलाच्या विलंबाबाबत निवेदन दिले आहे का ? | प्रथम अपिल सुनावणी सुचना पाठविल्याचा दिनांक |
| ०६/०८/२०२१ | २०/०८/२०२१ | नाही | – | २०/८/२०२१ |

प्रथम अपिल सुनावणी दिनांक व वेळ :- दि. ०७/०९/२०२१ रोजी दुपारी १२.३० वाजता.
सुनावणीस अपिलकर्ता :- उपस्थित
सुनावणीस जनमाहिती अधिकारी :- उपस्थित

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | अर्जदाराने मागितलेली माहिती | जनमाहिती अधिकाऱ्याने दिलेले उत्तर/माहिती |
|---|---|---|
| १ | येवलेवाडी प्र.क्र.४१ खंडोबा मंदिर येथील रस्त्याबाबतची माहिती मिळणेकामी अर्ज केला होता. | 'दि.०१/०५/२०१७ रोजी नव्याने स्थापित कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडून सदर ठिकाणी रस्त्याचे काम करणेत आलेले नाही. तसेच ग्रामपंचायत काळातील व त्या आधीचे सदर रस्त्याबाबत आमचे कार्यालयाकडे कोणतेही दस्तऐवज उपलब्ध नाहीत.' असे पत्र जा.क्र.१४७२ दि.०७/०७/२०२१ अन्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कोंढवा-येवलेवाडी, पुणे महानगरपालिका यांनी सांगितले.' |

## विवेचन

जा.क्र.१४७२ दि.०७/०७/२०२१ अन्वये पत्र मिळाले असलेचे अपिलकर्ता यांनी सांगितले. परंतु सदर माहितीने समाधानी नसलेबाबत अपिलकर्ता यांनी सांगितले.

कार्यालयाकडील उपलब्ध दस्ताऐवज तपासले असता माहे मे २०१७ रोजी नव्याने स्थापित कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडून सन २०१७ पासून आजतागायत सदर रस्त्यावर कोणतेही काम करणेत आलेले नाही. तसेच ग्रामपंचायत काळातील व त्या आधीचे कोणतेही दस्ताऐवज आमचे कार्यालयाकडे अढळ होत नाही. असे जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी सांगितले.

## -: आदेश :-

उपरोक्त विवेचनामधील जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कोंढवा येवलेवाडी व अपिलार्थी यांचे म्हणणे विचारात घेवून अपिलार्थी यांनी अर्जात विचारले प्रमाणे सदर रस्त्याबाबत माहे मे २०१७ रोजीपासून कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयामार्फत कोणतेही काम करणेत आलेले नाही व त्याआधीचे सदर रस्त्याबाबतचे कोणतेही दस्ताऐवज कार्यालयाकडे उपलब्ध नसलेचे निर्दशनास आलेले आहे.

सबब, मा.जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, कोंढवा येवलेवाडी यांनी जा.क्र.१४७२ दि.०७/०७/२०२१ रोजी दिलेले उत्तर कायम करून सदर अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल सोनवणे)
अपिल प्राधिकारी तथा उप अभियंता
कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय
पुणे महानगरपालिका

दिनांक आणि ठिकाणः ०७/०९/२०२१,पुणे.

टीप :- १. सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास माहिती अधिकार अधिनियम कलम १९(३)नुसार मा.आयुक्त,राज्य माहिती आयोग,नविन प्रशासकिय इमारत,विधानभवन समोर पुणे ४११००१ यांचेकडे अपिल करता येईल.

२. प्रथम अपील सुनावणी आदेशाची प्रत सुनावणी नंतर सात दिवसांच्या मुदतीत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रत :-१. अपिलकर्ता श्रीमती भारती रोहिदास कामठे,
राहणार :- मु.पो.येवलेवाडी, पुणे

२. जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता ,कोंढवा-येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालय,
पुणे महानगरपालिका.

यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.......